Academic Sports Scholars
International Online Physical Education & Sports Research Journal

ISSN: 2277-3665 Impact Factor : 2.9052(UIF) Volume - 5 | Issue - 3 | March - 2016

# " भारतातील बौद्ध धम्माचे पुनरूत्थान "



संदेश वाघ
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ.

### 1. प्रस्तावना :

प्राचीन जम्बुद्विप आणि विद्यामान भारत भूमित स्वंय तथागत भगवान बुद्ध हयात असतांना शील समाधिउ आणि प्रज्ञा या बुद्ध विचाराणे प्राचीन भारतीय समाज प्रभावीत झाला होता.

अविद्या - अं:धकार आणि कर्मकांड या अनैसर्गिक परंपरेस खंडीत करण्याचे प्रथमच कोणीतरी सम्यक् ज्ञान मानवी समाजास समर्पित केले होते. संपूर्ण प्राचीन भारत भूमी बुद्ध विचाराणे प्रभावीत झाली. प्रत्येक मानवा मानवात बुद्ध आणि बुद्ध विचाराबद्दल श्रद्धा - सम्यक् आस्था आणि प्रामाणिक समर्पित सम्यक् भावना (दृष्टी) उत्पन्न झाली.

भगवान तथागतांच्या प्रभावशाली दु:खमुक्तीच्या बुद्ध तत्वज्ञानाने मानव समाज दु:क्ख मुक्त झाला. नैसर्गिक नियम व सत्याचा सन्माण करणारा शुद्ध बुद्धो पदेश ग्रहण करून अनेकांनी आपल्या अज्ञानावर विजयप्राप्त करून सम्यक् प्रज्ञेचा त्यांनी साक्षात्कार केला. अनेक राजपूत्र - राजाकुमार, धनाडय व्यापारी व व्यापारी पूत्र बुद्ध सहवासात स्वत:ला सिद्ध करण्यास धन्यता मानत. तथागत बुद्धाकडे मानवी समानाच्या दु:खमुक्ती सामाजिक परिवर्तनाचे जनक आदर्श महामानव स्वरूप तथागतांचा स्विकार झाला.

प्राचीन भारतीय समाजास प्रभावित करण्यासाठी बुद्ध तत्वज्ञानातील 'समता' या सिद्धांताने महत्वपूर्ण केले. बुद्ध तत्वज्ञान समजुन घेण्यास जात - पात, धर्म, श्रीमंत - गरीब, लहान - मोठा, स्त्रि - पुरूष, उच्च - निच, असा कोणताही भेदभाव न ठेवता

बुद्धतत्व ज्ञान समजुन घेण्यासाठी प्रत्येक मानवसत्वास बुद्धाकडे समान वागणुक आहे. 'यश नावाचा राजकुमारही बुद्ध मार्गात आला आणि 'सुनिल' नावाचा भंगी समाजाचा सामान्य नागरीकही आला. राजकुमार आणि एक सामान्य भंगी नाकरीक या दोघ्झानाही बुद्ध मार्गात समान वागणूक आणि सन्मान आहे. हे 'समता' तत्वज्ञान प्राचीन भारतीय समाजास प्रथमच पाहवयास मिळाले. बुद्ध तत्वज्ञानात मानव आणि मानवतेचा मोठा सन्मान आहे या 'मानवतावादी' दृष्टीकोनाने संपूर्ण भारतीय समाज प्रभावीत झाला. जवळ – जवळ सर्वच जंबुद्विपाने बुद्धाचा स्विकार केले. आम्ही सर्व बौद्धानुयायी म्हणून भारतीय समाजाने एकमेकांचा सन्मान केला. संपूर्ण जंबुद्विप 'बुद्धमय' जंबुद्विप झाले.

कालांतरानंतर प्राचीन भारतातील बुद्ध तत्वज्ञानास नाकारणारा कर्मकांड, अंःधश्रद्धा यज्ञयाग, अनैसर्गिक प्रथा – परंपरा माननारा वर्ग पूढे आला. पुन्हा एकदा भारतीय समाज अविद्या आणि अंःधकारमय जीवनाकडे झु कला. भारतातुन जवळ – जवळ बौद्ध – धम्म नष्टच झाला.

काषाय वस्त्र धारण केलेला भिक्खु व्यतिरिक्त बुद्धानुयायी राहीला नाही. एका भव्य आणि दीर्घ कालखंडानंतर सम्राट देवनामपिय चक्रवर्ती अशोक राजाचा काळ येईपर्यंत भारतीय परंपरा बुद्ध वचनाशिवाय पोरकी रहीली.

देवनामपिय राजा सम्राट चक्रवर्ती अशोकाचा राजाश्रय बौद्ध धम्मास प्राप्त झाला. सम्राट अशोक स्वतः बौद्धाबुयारी म्हणून उद्घोष झाला. बौद्ध धम्माच्या प्रचार आणि प्रसार कार्यासाठी सम्राटाने ८४,००० हजार संघाराम बुद्ध लेणी, विहार आणि शिलालेखांची निर्मिती केली. बुद्ध विहार आणि लेण्यांमध्ये हजारो बौद्ध भिक्खु प्रशिक्षणार्थ तयार झाले. सम्राट अशोकाच्या 'धम्मक्रांतीने' भारतात पुन्हा एकदा 'बौद्ध मय' भारताचे वातावरण तयार झाले.

देवनामपिय राजा सम्राट अशोक यांच्या बुद्ध विचार प्रभावाखाली भारतीय परंपरेने अनेक वर्ष दीर्घ कालावधी पाहीला सम्राट अशोकांच्या प्रभावानंतर पुन्हा एकदा बौद्ध परंपरेवर आक्रमन करून, भिक्खुंच्या कत्तली झाल्या. बौद्ध परंपरा नष्ट करून अनैतिक, विषमतांवादी, चार्तुवर्ण व्यवस्था प्रभाव उदयास आला. मानवा – मानवात भेद निर्माण करणारा 'विषमता' विचार समाजात थोपवीला. मारनव समाजातील एका विशिष्ट वर्गास मानव असुनही त्यांना जन्मत'च 'गुलाम' बनविण्यात आले. भारतातून 'समता' वादी बुद्ध विचाराचा काळ जवळ – जवळ नष्टच झाला होता.

सम्राट धम्म अशोकाचे पुत्र राजकुमार महेंद्र आणि राजकन्या 'संघमित्र' यांच्या द्वारा बौद्ध भिक्खु व भिक्खुनी म्हणून श्रीलंका येथे स्थापीत झालेला बुद्ध धम्म सुरक्षीत होता. भारतातून नष्ट झालेला बुद्ध धम्म श्रीलंका येथे प्रभाव रूपाने बुद्ध विचार सांगत होता. १८व्या शतकातील समयी ब्रिटीश ख्रिश्चन प्रभावाचे राज्य आले तरी श्रीलंकेतील बौद्ध धम्म आपल्या अस्तित्व रूपाने टिकून राहीला.

### *अनागरिकः*

१८६१ साली भारतातील बुद्ध विचार भारतात परत घेवून जावा असा क्रांतीकारी विचार अनागरीक 'धर्मपाल' नावाच्या एका महापुरूषाच्या मनात उत्पन्न झाला. हजारा वर्षापूर्वी भारतात स्थापीत झालेला बौद्ध धम्म आज भारतात नाही.

अनागरिक धम्मपाल यांनी १८८५ साली एका मासिकात भारतातील बौद्ध स्थळांची दैनिय अवस्था या संदर्भात एका मासिक पत्रात माहीती प्राप्त केली. हे वाचुन त्यांना अतिव दुःख झाले भारतातील प्राचीन बौद्ध स्थळांचा पुनरूद्धाराचां संकल्प त्यांनी केला.

डिसेंबर १८६० मध्ये अनागरिक धर्मपाल अडयार (मद्रास) येथे थियासॉफिकल सोसायटीच्या सम्मेलनाचे व्यवस्थापन करण्याकरीता आले होते. सम्मेलनाच्या समाप्तीनंतर श्रीलंका परत जाण्याच्या अगोदर भासरतातील प्राचीन बौद्ध स्थाळांची भेट आणि दर्शण करण्याची श्रद्ध त्यांना उत्पन्न झाली. तेव्हांच अनागरिक धर्मपाल यांनी 'सारनाथ आणि 'बुद्धगया' या ऐतिहासिक दोन स्थळांस भेट देण्याचे ठरविले.

### *अनागरिक धर्मपाल यांची 'सारनाथ' भेट :*

ठरलेल्या कार्यक्रमानुसार अनागरिक धर्मपाल, कर्नल ऑलकॉट व एक जपानी भिक्खु समुद्रमार्गे मुंबईला आले. तेथून १८ जानेवारी १८६० ला बनारसला पोहचले. तेथे त्यांनी त्यांचे मित्र उपेन्द्रनाथ बसू यांची भेट घेतली. दिनांक २० जानेवारी, १८६० ला ते 'सारनाथ' येथे गेले. भगवान बुद्धांनी २५०० वर्षापूर्वी सारनाथ येथील ऋषीपतन मृगदाय वानात पंचवग्गिय भिक्खुंना आपल्या मध्यम मार्गाचे पहिले प्रवचन दिले. सारनाथ येथेच बुद्धांनी पहिला वर्षावास केला तेथूनच तथागतांनी ६० भिक्खुंना धम्मादेश दिला....

''चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय
बहुजन सुखाय।
लोकानुकम्पाय अत्थाय, हिताय सुग्वाय
देवमनुस्सानं।
देलेथे भिक्तवे, धम्मं अदि कल्याणं मज्झे कल्याणं
परियोसान कल्याणं।
सात्थं सव्यज्जनं केवल परिपुण्णं
परिसुद्धं ब्रम्हचरिय पकासेथ।''

### *सारनाथची अत्यंत वाईट अवस्था :*

अडीच हजार वर्षानंतर बुद्ध धम्माचा कोणी पाईक येथे उरला नसल्यामुळे सारनाथ या ऐतिहासिक स्थळाची अत्यंत वाईट अशी अवस्था त्यांना दिसून आली. प्राचीन संघारामाळी भग्नावशेष पडलेल्या अवस्थेत होती. मानवांचा राबता नसल्यामुळे तेचे जवळ – जवळ चोहबाजुंबी जंगलच वाढलेले होते.

संघाराम आणि धम्मराजिक स्तुपाच्या भग्नावशेषावर गवत आणि जंगली झाडेझुडपी वाढली होती. बुद्धस्तुपांचे दगड जमिनीत खचुन गेले होते व त्यावर झाडेझुडपे वाढल्यामुळे ते झाकून गेले होते.

सारनाथ विहाराचे प्राचीन नाक्षिदार दगड चोरून नेण्यात आली होती. मुलगंध कुटीचे तर अस्तित्वच संपुष्टात आले होते. मुळ गंधकुटीचा फक्त पायाच तेवढा दिसत होता. [४]

'धम्मेकस्तुपाचा' पाया जागोगागी जमिनीत खचला होता. ७०० वर्षापासून ही ऐतिहासिक बुद्ध भूमी वास्तु मानवी सहवासाने उपेक्षीत होती. भारताची राजमुद्रा असलेला चारसिंहाचा स्तंभ, जो सम्राट अशोकाने उभा केला होता तो मधातून तुटून पडला होता.

### *अनागारिक धर्मवाल यांचा सारनाथ पुनरूद्धाराचा संकल्पः*

सारनाथ येथील प्राचीन बुद्ध स्तुप आणि विहार वास्तुंचे भग्नावशेष पाडून अनागारिक धर्मपालांचे मन गहिवरून गेले. भगवान बुद्धांच्या प्रत्यक्ष सहवासाने पावन झालेल्या बुद्ध भूमीत एक रात्र वास्तव्य करावे असा त्यांनी संकल्प केला. [५] तेथेच एका वट्टवृक्षाखाली त्यांनी संपूर्ण रात्र काढली सकाळी या पावनपवित्र भूमिस प्राणाम करून, सकाळच्या सोणेरी सूर्य किरणांच्या साक्षीने या सारनाथ भूमिचा मी पुनरूद्धार करेल असा संकल्प केला. त्या भूमिला पंचाग प्रणाम करून ते पूढे बुद्धगया दर्शनासाठी बुद्धगयेस खाना झाले.

### *अनागारिक धर्मपाल यांची 'बुद्धगया' भेटः*

दिनांकः २२ जानेवारी १८९० ला ते 'बुद्धगया' तेथे पोहोचले. तेथील वातावरण बुद्धगया परिसर पहिल्यानंतर तेथील परिस्थिती तर फारच वाईटे झाली होती. ज्या भूमित तथागत भगवान गौतम बुद्धांनी जगाच्या दुःखमुक्तीचे ज्ञान प्राप्त केले, ते स्थळ संपूर्ण विश्वातील बौद्धांसाठी परमपावन तिर्थक्षेत्र आहे. पंरतू या ऐतिहसिक प्राचीन बौद्ध वास्तूंवर एक हिंदू शैव महंताचे स्वामित्व दिसून आले.

बुद्धगया येथील प्रसिद्ध ऐतिहासिक 'महाबोधि' बुद्ध विहारात बौद्ध परंपरेनुसार बुद्ध पूजा करण्या ऐवजी तेथे महंतांच्याद्वारा बुद्धविरूद्ध पूजापाठ – आणि कर्मकांड पाडुण त्यांचे मन व्यथीत झाले.

भारतातील या धम्मविरोधी व धम्मसंदर्भात भारतीय समाजाची उदासिन यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रचंड मोठा लढा ध्यावा लागेल. अशी त्यांनी भूमिका निर्माण केली. श्रीलंका येथे जावून महाबोधी नावाचे एक संघटन स्थापण करून एक आंतरराष्ट्रीय महाबोधी मुक्ती लढा निर्माण करण्याचा संकल्प करून ते बुद्धगयेस प्रणाम करून निघाले बुद्धगयेचे पुनरूत्थान केलेच पाहिजे यां शिवाय त्यांच्या मनात काहीच नव्हते. [७]

### *बुद्धगया महाविहार मुक्ती संग्रामः*

बुद्धगयेची दैनियस्वरूपाची अवस्था पहिल्यानंतर बुद्ध गया महाबोधी महाविहाराचा मुक्ती संकल्प त्यांना शांत बसु देत नव्हता.

सन ३१ मे, १८९१ ला त्यांनी महास्थवीर एच.सुमंगल आणि मिगेटुवे गुणानंद यांच्या मार्गदर्शनाखाली महोबोधी सोसायटीची स्थापना केली.

- एच सुमंगल महास्थवीर – अध्यक्ष
- कर्नल ऑलकॉट – संचालक
- वीर शेखर आणि धर्मपाल – सचिव
- डब्लू डी. एब्रेन – कोषाध्यक्ष
- पंडित वटुपान्टुदवे – सदस्य

आणि इतर १२ जन असे एकुन १७ जन या पहिल्या महाबोधीसभेच्या कार्य कारणीत सहभागी होते.

१० जुलै १८९१ ला अनागारिक धर्मपाल यांनी ५ भिक्खु श्रीलंकेवरून भारतात आनले आषाढ पौर्णिमा या दिनाचे अौचित्य साधून त्यांची बुद्धगया येथे राहण्याची व्यवस्था केली.

१५ जुलै १८९१ ला प्रथमच बुद्धगया येथे 'धम्मध्वज' फडकला या महत्वपूर्ण क्षणाचा त्यांनी आपल्या दैनंदिन मोटया खुशिने उल्लेख केला आहे.

''After centuries the Buddhist flag been haisted at Buddhi Gaya'' [८]

भविष्यात अनेक वर्ष व्यवस्थेच्या विरूद्ध महाबोधी महाविहार मुक्ती अंदोलन लढा चलविला.

### *संदर्भः*

१) आचार्य सूर्यकान्त भगत, धम्मनायक अनागारिक धम्मपाल, सुधीर प्रकाशन, वर्धा, १३ ऑक्टोंबर, २०१३, पृ.क्रं. – ४७–४८

२) कित्ता, पृ.क्रं. ८० – ८१
३) कित्ता, पृ.क्रं. ८२
४) कित्ता, पृ.क्रं. ८३
५) कित्ता, पृ.क्रं. ८४ – ८५
६) कित्ता, पृ.क्रं. ८५ – ८६
७) कित्ता, पृ.क्रं. ८६ – ८९
८) कित्ता, पृ.क्रं. ९० – ९१.